*Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

# Introduction to Western Epistemology and Metaphysics

## प्रकरण चौथे

## पाश्चात्य ज्ञानशास्त्र आणि सत्ताशास्त्र यांचा परिचय

1. ज्ञान म्हणजे समर्थनीय सत्य विश्वास (Knowledge as justified true belief)
2. प्लेटोचा चिद्वाद (Idealism of Plato)
3. देकार्तचा द्वैतवाद (Dualism of Descartes)
4. डेमॉक्रिटसचा भौतिकतावाद (Materialism of Democritus)
5. ॲरिस्टॉटलचा कार्यकारणभाव (Causation theory of Aristotle)



---

## प्रस्तावना :

या प्रकरणात आपण तत्त्वज्ञानाच्या पाच शाखापैकी ज्ञानशास्त्र आणि सत्ताशास्त्र या शाखांचा परिचय पाश्चात्य तत्त्वज्ञानाच्या दृष्टिकोनातून करुन घेवू. त्यात ज्ञान ही संकल्पना, सत्ताविषयक सिध्दान्त आणि कार्यकारणभाव अशा तीन प्रमुख मुद्द्यांचा समावेश आहे.

## 1. ज्ञान म्हणजे समर्थनीय सत्य विश्वास (Knowledge as justified true belief)

### प्रस्तावना :

ज्ञानशास्त्र[1] आणि सत्ताशास्त्र[2] या दोन्ही शाखांची सविस्तर माहिती आपण यापूर्वीच पहिल्या प्रकरणात घेतलेली आहे.या शाखा परस्परांशी जोडल्या गेलेल्या आहेत.ज्ञानाच्या प्रक्रियेत ज्ञान,ज्ञेयवस्तू आणि ज्ञाता असे तीन घटक असतात. ज्याचे ज्ञान व्हावयाचे असते ती वस्तू म्हणजे *ज्ञेयवस्तू* आणि ज्यास ज्ञान होते ती व्यक्ति म्हणजे *ज्ञाता* आणि या दोघांमधील आंतरक्रिया म्हणजे *ज्ञान.*

ज्ञानशास्त्र ज्ञानाचा अभ्यास करते तर सत्ताशास्त्र ज्ञानप्रक्रियेचा घटक असलेल्या ज्ञेयवस्तूचा अभ्यास करते. ज्ञेयवस्तू ही सत्ता असते. म्हणजे अस्तित्वात असणारी वस्तू असते.अशा सत्तेचे ज्ञान हा ज्ञानशास्त्रातील महत्वाचा घटक असल्याने ज्ञान व सत्ता परस्परांशी निगडीत आहेत.साहजिकच त्यांचा अभ्यास करणाऱ्या या दोन्ही शाखांचा अभ्यासही एकत्रच केला जातो.किंबहुना तो आपसूकपणे होतोच.

---

[1]ज्ञानशास्त्र (**Epistemology**) ही तत्त्वज्ञानाची शाखा ज्ञानविषयक समस्यांचा अभ्यास करते.इंग्लीशमधील **Epistemology** ही संज्ञा *Scottish philosopher* ***James Frederick Ferrier (1808–1864)*** या तत्त्ववेत्त्याने प्रथम प्रचारात आणली. Greek भाषेत episteme = science आणि logos = knowledge, असा अर्थ होतो, म्हणून the science of knowledge is epistemology अशी व्याख्या होते.)

[2]सत्ताशास्त्र (**Metaphysics**) ही तत्त्वज्ञानाची शाखा सत्ताविषयक समस्यांचा अभ्यास करते.इंग्लीशमधील **Metaphysics** ही संज्ञा ॲंड्रोनिकस (ऑफ ऱ्होड्स, पहिले शतक **Andronicus of Rhodes,** 60 BC) ग्रीक तत्त्ववेत्ता, ॲरिस्टॉटलने स्थापन केलेल्या 'येरझाऱ्या पंथाचा (The Peripatetic school) अकरावा प्रमुख' आणि संपादक - ग्रंथपाल, याने प्रथम प्रचारात आणली.त्याने ॲरिस्टॉटलच्या ग्रंथांची रचना करताना Physics च्या पुस्तकांच्या नंतर ईश्वर, आत्मा, मन, ज्ञान इत्यादीविषयक ग्रंथ क्रमाने लावले. त्यामुळे या ग्रंथांना After the Physics म्हणून Metaphysics असे नाव मिळाले.Greek भाषेत Meta म्हणजे नंतर, आणि *physiká* म्हणजे Physics.



Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*



ज्ञानशास्त्र ही शाखा मुख्यत: ज्ञानाचे स्वरुप,प्रकार,ज्ञानाचा मार्ग,ज्ञानाच्या मर्यादा आणि निकष यांचा म्हणजेच पुढील समस्यांचा अभ्यास करते :

1. ज्ञान म्हणजे काय ? - *ज्ञान ही संकल्पना*
2. ज्ञान कसे मिळते ? - *ज्ञानाची साधने*
3. ज्ञान कसे होते ? - *ज्ञानाची प्रक्रिया*
4. ज्ञानाचा निकष - *ज्ञानाची वस्तुनिष्ठता*
5. आपल्याला ज्ञान झाले आहे , याचेच ज्ञान कसे होते ? - *ज्ञानाचे ज्ञान*

साधारणत: माहिती म्हणजेच ज्ञान असे समजले जाते.पण माहिती व ज्ञान यात फरक आहे, हे आपणास माहित आहेच.विशेषत: आजच्या तंत्रज्ञान माहितीयुगात (Age of Information & Technology) माहितीलाच ज्ञान समजले जाते.पण ते चूक आहे. कारण तत्त्वज्ञानात्मक दृष्टिने पाहता ज्ञान म्हणजे समर्थनीय सत्य विश्वास.आणि माहिती म्हणजे केवळ माहिती की जिचे समर्थन केले जातेच, असे नाही.

## समर्थन, सत्यता आणि विश्वासार्हता : *ज्ञान म्हणजे समर्थनीय सत्य विश्वास*

ज्ञानशास्त्र मुख्यत: ज्ञान ही संकल्पना आणि तिचे समर्थन यावर भर देते.हे समजावून घेण्यासाठी ज्ञानाच्या स्वरुपाचे विश्लेषण करणे,या ज्ञानाचा सत्य,विश्वास आणि समर्थन या ज्ञानाशी संबंधित तीन संकल्पनांशी काय संबंध आहे, ते स्पष्ट करणे आवश्यक आहे.हा संबंध समजला तरच ज्ञानाची निर्मिती कशी होते, ते आपल्या जीवनात कसे उपयोगी पडते, त्याचे आकलन होईल.त्यासाठी या तीन संकल्पनांचे स्वरुप पाहू आणि त्यानंतर तत्त्ववेत्त्यांनी मांडलेले विचार पाहू.

बहुधा असे घडते की बोलणारी व्यक्ति तिला उपयोगी असणाऱ्या गोष्टीवर 'विश्वास' ठेवते. पण ज्ञानशास्त्रात अशा प्रकारचा विश्वास कामाचा नाही. ज्ञानशास्त्राच्या मते 'एखाद्या गोष्टीवर विश्वास ' ठेवणे याचा अर्थ असा की जे सांगितले गेले आहे ते 'सत्य' असले पाहिजे.उदाहरणार्थ,समजा एखादी व्यक्ति ।असे म्हणाली की ' आकाश निळे आहे.'' तर या बोलण्यावर विश्वास का ठेवावा ? कारण या वाक्यात जे सांगितलेले आहे,ते सत्य आहे.तत्त्वज्ञानाच्या भाषेत आकाशाविषयी केले गेलेले ते विधान सत्य विधान आहे.

" 'आकाश निळे आहे', " *हे विधान सत्य आहे,* " असे ते संपूर्ण म्हणणे असते. बोलणारी व्यक्ति तेच म्हणणे विधानामधून स्पष्ट करीत असते."आकाश निळे आहे", हे मी जाणतो पण विश्वास ठेवत नाही " *असे विधान ती करु शकत नाही.* कारण तसे म्हणणे चुकीचे, आत्मव्याघाती ठरेल.तसे विधान केल्यास ते विधान असत्य ठरते, त्यामुळे त्या विधानावर विश्वास ठेवता येत नाही.ते स्वीकारता येत नाही.

त्याउलट विश्वसनीय विधानातील सत्य नाकारता येत नाही.जसे की '' ''*मला ज्योतिष्याविषयी माहिती आहे, पण मी त्यावर विश्वास ठेवत नाही '', हे विधान सत्य आहे ''* असे म्हणता येते.ते स्वीकारता येते.किंवा असेही असू शकते की एखाद्याचा भविष्यशास्त्रावर विश्वास असतो पण त्याला त्याचे काहीच ज्ञान नसते ! याचा अर्थ असा की विश्वास ही व्यक्तिच्या वर्तनाचा अगदी *खासगी आधार* असतो.त्या संबंधित व्यक्तिशिवाय इतरजन *तो विश्वास स्वीकारतीलच असे नाही.* पण सत्यता मात्र सर्वांना मान्य असते.आणि तसे सत्य विधान स्वीकारले जाईल, अशी सार्वत्रिक बाब असते.

सत्य विषयक आणखी थोडी माहिती आवश्यक आहे.सत्य असणे म्हणजे सत्यता असणे.सत्यता हा विधानाचा गुण असतो, वस्तुस्थितीचा नाही.एखादी वस्तुस्थिती सत्य आहे, याचा अर्थ त्या वस्तुस्थितीविषयी केलेले विधान सत्य असणे.म्हणजे विधानात सांगितलेली, व्यक्त केलेली वस्तुस्थिती वास्तवात असणे, म्हणजे

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052

सत्यता असणे.त्यामुळेच सत्यता हा विधानाचा निकष बनतो.असे सत्य विधान जी वस्तुस्थिती सांगते तशी ती असेल तरच ते विधान सत्य असते. आणि विधान सत्य असेल तरच ते ज्ञान असते, अन्यथा ते अज्ञान असते.सूर्य पूर्वेला उगवतो,हे विधान सत्य आहे. कारण तशी वस्तुस्थिती आहे.

थोडक्यात **सत्य विधान म्हणजे ज्ञान होय.**

सत्याच्या आधारे विधानाची ज्ञानात्मकता सिध्द करणे म्हणजे ज्ञानाचे समर्थन करणे होय. म्हणूनच एखादे विधान उपयोगी पडते,यश मिळवून देते म्हणून ते विधान सत्य असते, असे नाही.''वस्तू (उदा.मोबाईल) तपासून घेणे,नंतर तक्रार चालणार नाही '' असे विक्रेता म्हणतो तेंव्हा तो विश्वास ठेवता येईल असे सत्य विधान करीत नसतो तर संशयास्पद विधान करीत असतो.ते विधान कदाचित त्याला उपयोगी पडेल पण सार्वत्रिक सत्य म्हणून इतर माणसे (ग्राहकवर्ग) ते विधान स्वीकारु शकत नाही (म्हणजे असा व्यवसाय अविश्वासू ठरेल, तो बंद करावा लागेल.)



ज्ञान म्हणजे समर्थनीय सत्य विश्वास[3] असतो, असे म्हणण्याचाच अर्थ ज्ञानाचे मार्ग आणि त्या मार्गाचे समर्थन करता येणे होय.पारंपरिक दृष्ट्या ज्ञानाचे चार मार्ग आहेत :

(1) पंच ज्ञानेंद्रिये
(2) स्मृति (स्मरणशक्ति)
(3) आत्मपरीक्षण आणि
(4) बुध्दि.

हे मार्ग स्वीकारता त्यातून दोन वाद तत्त्वचिंतनाच्या परंपरेत निर्माण झाले.

पहिला मार्ग : अनुभववाद (Empiricism) - पंच ज्ञानेंद्रियाचा मार्ग म्हणजे प्रत्यक्ष अनुभव घेणे असते.

दुसरा मार्ग: बुध्दिवाद (Rationalilsm) - बुध्दिचा मार्ग म्हणजे विचार करणे, त्यातून ज्ञानप्राप्ती होते .

आता आपण विविध तत्त्ववेत्यांनी हा सिध्दान्त कसा मांडला ते पाहू.अनुभववादातून भौतिकतावाद, जडवाद निष्पन्न होतात तर बुध्दिवादातून चिद्‌वाद, चेतनावाद, आत्मावाद निष्पन्न होतात.

या संदर्भात (1) चिद्‌वाद (प्लेटो,बर्कले), (2 ) भौतिकतावाद ( डेमॉक्रिटस ), (3) द्‌वैतवाद (देकार्त) आणि (4) कार्यकारणभाव (ॲरिस्टॉटल, ह्यूम ) असे चार सिध्दान्त आहेत.

## 2. सत्ताविषयक सिध्दान्त :

### 1) प्लेटोचा चिद्‌वाद (Idealism of Plato)

प्लेटो Plato[4] (इ.स.पू. 427 ते 347) हा ग्रीक तत्त्वज्ञ असून एकूणच साऱ्या पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा तो मूळ आधार समजला जातो.त्याच्या तत्त्वज्ञानावरच सगळ्या पाश्चात्य - युरोपीय जगाची संस्कृती एकेकाळी अवलंबून होती.प्लेटोला *'तत्त्वज्ञानाचा मुगुटमणी'* समजले जाते.सॉक्रेटीसची महती प्लेटोमुळेच जगाला

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

---

[3]ज्ञान म्हणजे समर्थनीय सत्य विश्वास या सिध्दान्तावर विसाव्या शतकात एडमंड गेटीएर **Edmund L. Gettier III** (born 1927 in Baltimore, Maryland) या ॲंग्लोअमेरिकन तत्ववेत्याने वेगळ्या भूमिकेतून टीका केली आहे.त्याने या संदर्भात 1963 साली केवळ तीन पानी "Is Justified True Belief Knowledge?" या नावाचा निबंध लिहिला. पण या वर्षी अभ्यासाला नाही.


[4] Plato म्हणजे "*broad*", म्हणजे रूंद छातीचा म्हणजेच भरदार विशाला छातीचा'

*Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*


कळाली. सॉक्रेटीसला प्लेटोने त्याच्या तत्त्वज्ञानात मध्यवर्ती स्थान दिले.त्याच्या संवाद पध्दतीतील सॉक्रेटीस हेच महत्वाचे पात्र आहे.

प्लेटोने त्याचा ज्ञानसिध्दान्त *'थिएटेटस'* आणि *'फीडो'* या दोन संवादात प्रामुख्याने मांडला.त्याच्या मते, कोणत्याही व्यक्तिच्या मांडल्या जाणाऱ्या कोणत्याही समजुतीला, मताला, विश्वासाला ज्ञान म्हणता येत नसते. ज्ञान ही एक विशिष्ट प्रकारची रचना आहे.विश्वास म्हणजे तर ज्ञान नाहीच.पण ज्ञान या संकल्पनेत आणखीही काही गोष्टी जास्त असतात.ते समजण्यासाठी प्लेटो विश्वास आणि ज्ञान यात पुढील प्रमाणे फरक करतो.

***Plato***
*(427 - 347BC )*
*Classical Greek philosopher,*
*mathematician,*
*student of Socrates,*
*writer of philosophical dialogues,*
*and*
*founder of the Academy in Athens,*
*the first institution of higher education*
*in the Western world.*


Bust of Plato

## विश्वास आणि ज्ञान (belief & knowledge) : फरक

आपल्या भोवतालच्या जगाचे निरीक्षण केले असता असे आढळते की जगाचे ज्ञान आपल्याला प्रत्यक्ष इंद्रियांमार्फत होत असते आणि ज्ञानाचा विषय असलेल्या या जगात सतत बदल घडत असतात.वेगवेगळे ऋतू, वातावरण, हवामान,पशुपक्षी माणसे यात सतत परिवर्तन घडत असते.जगाचे स्वरुप नाशवंत आणि क्षणभंगुर आहे. हे लक्षात घेवूनच "या जगाचे स्वरुप बदलते आहे, म्हणून ज्ञान असणारे सत्य सुध्दा नेहमीच बदलते असते.ज्याला जसे दिसते ते त्याच्या दृष्टिने व त्याच्यापुरते सत्य असते" असा सिध्दान्त (प्लेटोपूर्वीच्या) सोफिस्ट तत्त्वज्ञांनी मांडला होता. पण प्लेटोला हा सिध्दान्त मान्य नाही.

थोडक्यात सोफिस्टांच्या मतानुसार इंद्रियसंवेदनामार्फत ज्ञान होते.पण ते सतत बदलते असते.ज्याच्या त्याच्यापुरते ते सत्य असते.जे स्थिर होते, अपरिवर्तनीय असते ते ज्ञान नसते,तर असत्य असते.

प्लेटो हे मत खोडतो.त्याच्या मते बदलत्या जगाचे ज्ञानही जर बदलत राहिले तर आपणास निश्चित ज्ञान होवू शकत नाही.ते ज्ञानही सतत बदलते,क्षणभंगुर आणि तात्पुरतेच राहाते.पाण्यात बुडालेली काठी वाकडी दिसते म्हणून ती वाकडी असत नाही. तिचे खरे स्वरुप वेगळेच असते.ज्याला जसे ज्ञान होते तसे ते असते, असे म्हंटले तर सत्य व असत्य यात फरक करणे शक्य होणार नाही.असे झाल्यास लोक असत्यालाच सत्य समजतील आणि सत्याला असत्य समजतील मग एकच गोंधळ होईल.सोफिस्टांची ही भूमिका अतिरेकी, व्यक्तिकेंद्री, सापेक्ष, चंचल, फसवी,उथळ व परस्परविरोधी आहे.त्यात अचूकता,स्थिरता,एकवाक्यता नाही, असे प्लेटो दाखवून देतो.आणि स्वत:ची ज्ञानाची संकल्पना मांडतो. ती पुढीलप्रमाणे,

## प्लेटोची ज्ञानाची संकल्पना

प्लेटोच्या मते ज्ञानाची दोन प्रमुख लक्षणे आहेत.ती अशी की , -

1) ज्ञान अचूक,अप्रमाद्य (infalliable) असते.या ज्ञानात कसलीही चूक किंवा प्रमाद होवूच शकत नाही.

2) असे ज्ञान नेहमी सत्य असले पाहिजे.


Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052



## ज्ञानाच्या दोन पातळ्या

प्लेटोच्या मते ज्ञानाच्या दोन पातळ्या आहेत. एक नीच, अप्रगत पातळी आहे तर दुसरी उच्च, प्रगत पातळी आहे.अगप्रत अवस्थेतील ज्ञान म्हणजे **'मत'** **(Opinion)** असते तर प्रगत व उच्च पातळीवरील ज्ञान हे खरे **'ज्ञान'** **(Knowledge)** असते.मत म्हणजे सतत बदलणाऱ्या जगाचे ज्ञान जे चंचल,फसवे आहे.ते इंद्रीयसंवेदनाने मिळते.तर ज्ञान हे जगाच्या न बदलणाऱ्या घटकाचे असते.येथे प्लेटोचा चिद्‌वाद सुरु होतो.

प्लेटोच्या मते ज्याचे आपणास ज्ञान होते ती वस्तू नसते तर त्या वस्तूची 'कल्पना' असते.तिला तो **'आयडिया'** **(Idea)**म्हणतो.ही कल्पना त्या वस्तूचे सारतत्त्व (essence) असते.वेगळ्या भाषेत वस्तूंमध्ये असणारा समान गुणधर्म म्हणजे आयडिया होय.नाणे,बांगडी,भाकरी,चपाती इत्यादी गोल वस्तूंमध्ये गोलपणा किंवा वर्तुळ नावाचा समान गुणधर्म असतो.अनेक घोड्यांमध्ये अश्वत्व, माणसातील मनुष्यत्व ही आयडिया असते. संगणकांमध्ये संगणकत्व ही आयडिया असते. त्रिकोण,चौकोन,चौरस,एक,दोन,तीन,झाड,नदी इ.इ.मध्ये त्या त्या वस्तूंच्या आयडिया असतात.जी जी वस्तू अथवा व्यक्ति असते तिची समान अशी आयडिया असते.

आता या आयडियाचे स्वरूप कसे आहे किंवा असते ? तर प्लेटोच्या मते ही आयडिया चैतन्यमय असते.ती शाश्वत, अमर, स्थिर, कायम,नित्य असते.ती कधीही बदलत नाही, अपरिवर्तनीय असते. सौंदर्य, नीती, मूल्य, प्रेम, करुणा, भावना, मैत्री,संख्या,ईश्वर,धर्म,गुणधर्म,संबंध,क्रिया या साऱ्या आयडिया आहेत.

आयडिया स्थिर, अपरिवर्तनशील,अविकारी,परिपूर्ण व अविनाशी असतात.त्यांचा कधी नाश होत नाही.त्या कधी जन्माला येत नाहीत त्या कधी मरत नाहीत.त्या केवळ *असतात.*जगातील प्रत्येक वस्तू, पदार्थ, घटना, व्यक्ति, काल यांच्या आयडिया असतात.

आता, कोठे असतात अशा आयडिया ? आयडिया मानवी बुध्दित असतात की जगात इतर अनेक वस्तूंसारख्याच एक वस्तू म्हणून अस्तित्वात असतात ? प्लेटोच्या मते जग नाशवंत असल्याने त्या जगात अस्तित्वात असूच शकत नाहीत, एकतर त्या अमूर्त असतात आणि दुसरे म्हणजे त्या भौतिक वस्तू नसतात.

मग आयडिया असतात तरी कुठे ? प्लेटोच्या मते आयडियांचेच स्वत:चे स्वतंत्र जग असते ! त्या जणू काही स्वर्गात वसत असतात. **आयडियांचे स्वतंत्र जग** असते. **(The World of Ideas).** प्रत्येक वस्तूच्या, नैतिक तत्त्वांच्या आयडिया या जगात असतात.g

अशा आयडियांनाच स्वतंत्र परिपूर्ण अस्तित्व,नित्य,शाश्वत अस्तित्व असते.या आयडियांचे ज्ञान हे अचूक,सत्य व नित्य असते.ते उच्च पातळीवरील असते.खरे अस्तित्व त्यांनाचा असते. मग त्यांचे ज्ञान कसे होते ? कोणत्या ज्ञानेंद्रियास होते? तर ,

प्लेटोच्या मते आयडियांचे ज्ञान ज्ञानेंद्रियास होत नाही.त्या केवळ बुध्दिलाच कळू शकतात. आयडिया चैतन्यमय असतात. जसे त्यांचे स्वरूप असते तसे त्यांच्या ज्ञानाचे साधन असते. या बुध्दिलाचा विवेकशक्ति म्हणतात. आयडियांनाच खऱ्या ज्ञानवस्तूचा दर्जा मिळू शकतो, म्हणून बुध्दि हेच खऱ्या ज्ञानवस्तूचे खरे ज्ञानाचे साधन असते.

अशा आयडियांची श्रेणिबध्द रचना असते. त्यात एक आयडिया सर्वोच्च असते. ही खुद्द आयडियांचीच आयडिया असते.ही आयडिया म्हणजे 'शिव' (The Good) ची होय. शिव म्हणजे ईश्वर (God) असेही प्लेटो म्हणतो.ईश्वर ही आयडियांची आयडिया आहे.ती सर्वोच्च आयडिया आहे.बुध्दिमार्फत माणसाला मिळणारे आयडियांचे ज्ञानच सत्य व नित्य असते, तेच केवळ समर्थनीय असते,असे प्लेटो म्हणतो.

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052


## 2) बर्कलेचा व्यक्तिनिष्ठ कल्पनावाद :

बुध्दि (किंवा मन ) हेच ज्ञानाचे साधन आहे, असे सांगणारा प्लेटोनंतरचा पाश्चात्य तत्त्वज्ञानातील दुसरा महत्वाचा विचारवंत म्हणजे जॉर्ज बर्कले (1685 ते 1753) हा आयरिश तत्त्वज्ञ होय.बर्कले चर्चचा बिशप (म्हणजे धर्मगुरु) होता.तो तत्त्वचिंतक तर होताच पण तळमळीचा कार्यकर्ता होता. जनतेचे कल्याण आध्यात्मिक आणि भौतिक दृष्टिकोनातून केले पाहिजे, ही त्याची भूमिका होती.त्यामुळे शुध्द जटील तत्त्वचिंतनाबरोबरच त्याने मोठे शिक्षणविषयक कार्यही केले.

**George Berkeley**
(12 March 1685 – 14 January 1753 )
known as **Bishop Berkeley**
Anglo-Irish philosopher.
Famous for a theory he called "immaterialism"
( subjective idealism: *"esse est percipi"* = "to be is to be perceived").



बर्कलेने बुध्दिला ज्ञानाचे साधन मानले खरे, पण तो मुळात अनुभववादी तत्त्वज्ञ आहे.बर्क्लेचा अनुभववाद **'व्यक्तिनिष्ठ चिद्वाद '** **(Subjectiv Idealism)** या नावाने ओळखला जातो.तत्त्वज्ञानाच्या इतिहासात बर्कलेची कामगिरी इतकी मूलगामी आणि महत्वाची आहे की त्यास ***'आधुनिक चिद्वादाचा जनक '*** ही पदवी देणे योग्य आहे, असे मत प्रसिध्द तत्त्वज्ञानाचा समीक्षक शॉपेनहॉवर (1788 ते 1860) यांनी व्यक्त केले आहे.

पाश्चात्य तत्त्वज्ञानात अनुभववाद सर्वप्रथम जॉन लॉक या ब्रिटीश तत्त्ववेत्त्याने (1632 ते 1704) मांडला.त्याचा वारसा चालविणारा दुसरा अनुभववादी तत्त्वज्ञ म्हणजे जॉर्ज बर्क्ले आणि तिसरा तत्त्वज्ञ म्हणजे डेव्हिड ह्यूम (1711 ते 1776) होय.

अनुभववादाचाच उपयोग करुन बर्कलेने ***'आधुनिक चिद्वाद'*** मांडला.व्यक्तिनिष्ठ चिद्वाद हे संवेदनांचे तत्त्वज्ञान आहे.बाह्यविश्वाचा अनुभव आणि अनुभव घेणारा ज्ञाता माणूस यांचे मन या दोन घटकांच्यात कोणता संबंध असतो, या विषयीचा सिध्दान्त त्याने मांडला.

बर्कलेच्या मते वास्तव किंवा वास्तविकता (reality) ही खरी ज्ञाता व्यक्तिच्या मनातच असते, एवढेच नाही तर खरी वास्तविकता केवळ मनालाचा असते, तेच अस्तित्वात असते, असे हा चिद्वाद सांगतो.बर्कले त्याचा अनुभववाद आणि प्रस्तुतचा सिध्दान्त त्याचा अनुभववादाचा गुरु जॉन लॉक याचा अनुभववाद खोडून मांडतो. त्यामुळे बर्कलेचा चिद्वाद पाहण्या आधी आपण लॉकचे मत थोडक्यात पाहू.

### लॉकचे मत : अनुभववाद

लॉकच्या मतानुसार आपला सारे ज्ञान केवळ अनुभवापासूनच सुरु होते. लॉकच्या मते मानवी मन हे कोऱ्या पाटी[5] सारखे असून अनुभवाने माणूस त्यावर लेखन करतो.जग व जगातील प्रत्येक घटकाचे, घटनेचे ज्ञान केवळ अनुभवानेच होते.त्यामुळे आपल्या मनात 'जन्मजात कल्पना नसतात' ***(No innate ideas).***सर्व कल्पना बाहेरुन मनात उमटतात.जगाचा अनुभव ज्ञानेंद्रियांनी येतो, हे खरे आहे.पण लॉकच्या मते या अनुभवास आपण 'अनुभव'म्हणणे चुकीचे असून त्यांना 'इंद्रिय संवेदन '*(sensations)* किंवा 'वेदन' म्हणणे योग्य

[5] लॉक मनाला कोरी पाटी ( **blank tablet -** ***tabula rasa***) म्हणतो.

Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052

आहे.आपल्या साऱ्या कल्पना आणि संवेदना आपणास अनुभवातूनच लाभतात.त्यांनाच सामान्यत: 'कल्पना'(Idea) म्हंटले जाते. या कल्पनारुपानेच ज्ञानप्राप्ती होते.या कल्पनेत तीन गोष्टी असतात :

1) इंद्रिय संवेदने (Ideas of Sensations)
2) या संवेदनांच्या प्रतिमा (Images)
3) आत्मनिरीक्षण किंवा अंर्तनिरीक्षण.



लॉकच्या मते जगाचे ज्ञान संवेदनाद्‌वारा मिळते,त्यांच्या प्रतिमा मनात तयार होतात आणि मनातील विचार, विकार इत्यादीचे ज्ञान अंर्तनिरीक्षणाने होते.थोडक्यात मानवी ज्ञानाचा विषय कल्पनाच असतात.त्यांचे साक्षात ज्ञान होते.खुद्द मनाचेही ज्ञान साक्षात होते.ते अर्थातच अंर्तनिरीक्षणानेच होते.

या साऱ्या कल्पना अमूर्त असतात आणि जगात वस्तू नसतात तर फक्त वस्तूच्या संवेदनाच असतात. कोणतेही ज्ञान वस्तूचे - म्हणजेच जगाचे,होत नाही तर फक्त वस्तूच्या संवेदनांचेच होते.वस्तू मूर्त असते तर संवेदना अमूर्त असतात आणि त्यापासून अमूर्त कल्पना तयार होवून त्यांचे साक्षात ज्ञान होते.

थोडक्यात, वस्तू मूर्त पण कल्पना अमूर्त आहेत.त्याच ज्ञानाचा विषय आहेत.त्यांचा अनुभव येतो.मनाची कोरी पाटी याच कल्पनांनी लिहीली जाते, असा लॉकचा सिध्दान्त[6] आहे.तो बर्कलेला मान्य नाही.तो त्याचे मत पुढीलप्रमाणे मांडतो.

## बर्कलेचा कल्पनावाद : ''अस्तित्व हाच प्रत्यय''

बर्कलेच्या मते, वस्तूला अस्तित्व असते किंवा बाह्यविश्व असित्वात आहे, असे आपण म्हणतो, तेंव्हा त्या विधानाचा नेमका काय अर्थ होतो, हे तपासले पाहिजे.वस्तूच्या संवेदना होतात, असा दावा करताना *संवेदना* या संज्ञेचा अर्थ काय होतो ? ते ही तपासले पाहिजे.उदा.''मी ज्या टेबलावर लिहितो, ते टेबल अस्तित्वात आहे '' असे मी म्हणताना मला टेबलाच्या संवेदना प्राप्त होतात, असा अर्थ होतो.मी खोलीत असताना ते पाहू शकतो, म्हणजे मी खोलीत असताना मला संवेदना मिळतात आणि संवेदना मिळतात त्या अर्थी ते टेबल अस्तित्वात आहे, असा त्याचा अर्थ होतो.पण मी खोलीत नसताना ते टेबल अस्तित्वात आहे का ? तर वरवरचे उत्तर ''नाही'' असे येते, पण बर्कले म्हणतो की ते उत्तर '' टेबल अस्तित्वात आहे '' असेच असते. कारण मी जर ते आत्ता पाहात नसलो तरी अन्य कुणी तरी व्यक्ति ते टेबल पाहू शकते !

आणि समजा कुणीच पहात नसेल तेंव्हा ते टेबल असते का ? तर तेंव्हाही ते टेबल असतेच. कारण मानवी व्यक्ति जरी ते टेबल पाहात नसली तरी ईश्वर ते टेबल पाहात असतो.

याचा अर्थ काय, तर ***मी*** ही ***जाणीव*** असणारा कुणीतरी दुसरा माणूस जगात अस्तित्वात आहे, दुसरा कुणीतरी नसलाच तर ईश्वर तरी असतोच, कारण ईश्वर स्वत:च **अंतिम जाणीव** अथवा **चेतना या** स्वरुपाचा आहे.तो टेबल जाणत असतो.जाणला जाणारा कुणीतरी असतोच ! कुणीतरी जाणल्याशिवाय टेबलाला अस्तित्व असू शकत नाही.ईश्वर टेबलाला सतत जाणत असतो, त्यामुळे ते टेबल नेहमीच अस्तित्वात असते, याचा अर्थ,मी किंवा जाणीवयुक्त कुणालातरी टेबलाची संवेदना प्राप्त झाल्याशिवाय टेबलाला अस्तित्व नसतेच. त्यामुळेच (मला किंवा अन्य कुणाला तरी) संवेदना होत नाहीत, पण वस्तू अस्तित्वात आहे, असे आपण म्हणू शकत नाही.

[6] जग आपल्याला जे काही सांगू इच्छिते तेच आपण पाहिले पाहिजे.जगाचे आपण तटस्थ आणि निरपेक्ष मनाने निरीक्षण केले पाहिजे.जगाकडून मिळणाऱ्या कोणत्याही माहितीचे आपण ती जशी आहे तशीच स्वागत केले पाहिजे.त्या माहितीवर आपण कोणतेही संस्कार केले किंवा त्यात बदल केले तर नको त्या कल्पना सुचत राहातात . मग आपली कल्पनाशक्ती भटकत राहाते आणि चमत्कारीक विचारांना जन्म देते.



Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052

बाह्यविश्वाला जाणणारा कुणी नसला तरी ते अस्तित्वात असते, असे सामान्यजनांना सुध्दा खरेच वाटते. नदी, झाडे, पर्वत,घरे,रस्ते, तारे इत्यादींनी भरलेले बाह्यविश्व आपल्या मनाबाहेर अस्तित्वात असतेच.

आता, या संवेदना कुणाला मिळतात ? तर बर्कलेच्या मते त्या संवेदना मनाला मिळतात.मला मन असते, मन हे जाणीवयुक्त इंद्रीय आहे.म्हणून मी जाणत असतो. ईश्वर हा विश्वाचे मन आहे, म्हणून मी नसलो तरी ईश्वराला ज्ञान होत असते, त्याला संवेदना मिळत असतात. '' वस्तूंचे अथवा घटनांचे अस्तित्व त्यांच्या होणाऱ्या इंद्रियसंवेदनातच सामावलेले असते. या संवेदना बाहेर अस्तित्वात नसतात, आतच असतात. त्या बाहेर आहेत, असा केवळ भास होत असतो.



तेंव्हा,वस्तू असणे याचा अर्थ तिचे संवेदन होणे.' अस्तित्वात असणे म्हणजेच प्रत्यय येणे, अनुभवास येणे.' थोडक्यात *''संवेदन हेच अस्तित्व* '' **(To exist is to be pereceived)** आणि ज्यास या संवेदना लाभतात ते मन किंवा व्यक्ति अस्तित्वात असते.ती असण्याचा निकषही संवेदनाच आहे. म्हणून ' **अस्तित्वात असणे म्हणजे संवेदनीय असणे** ' याचा अर्थ '' ***अस्तित्व हाच प्रत्यय'*** असेही बर्क्ले म्हणतो. कारण संवेदन ज्यास होतात ते मन अथवा आत्मा आहे, असाच 'संवेदन होणे ' चा अर्थ आहे.

आपल्या वासना,विकार आणि विचार यांना आपल्या मनातच अस्तित्व असते, हे कुणी नाकारीत नाही.हीच गोष्ट संवेदनाबाबतही खरी असते.संवेदन होणे म्हणजेच ती मनाला संवेदित होणे.एखादी गोष्ट (बाह्यविश्व) आहे,याचा अर्थ जोपर्यंत ती मनाला संवेदित होते, अनुभवाला येत असते तोपर्यंतच तिला अस्तित्व आहे,असाच केला पाहिजे.जगात जे कोणाच्याही अनुभवाला कधीही आलेले नाही, येत नाही, येणार नसते,तरीही ते अस्तित्वात आहे पण त्याचे ज्ञान होत नाही, असे म्हणणे हास्यास्पद, भोंगळ , अर्थशून्य फसवणूक करणारे असते.वस्तूंना (किंवा बाह्यविश्वाला) मनाशिवाय आणि मनापासून स्वतंत्र अस्तित्व असू शकत नाही, असे बर्क्लेचे म्हणणे आहे.वस्तू अस्तित्वात आहे, असे म्हणण्यासाठी तिला मी स्वत: किंवा कुणीतरी दुसरा माझ्यासारखा मन असणारा ज्ञानवान व्यक्तिनी तिला अनुभवणे आवश्यक असते.(समजा असे कुणी नसेल तर मग ईश्वर तर असतोच. त्याला या विश्वाचे ज्ञान होते.)

थोडक्यात, वस्तू असणे याचा अर्थ तिचे संवेदन होणे, ते संवेदन मनाला होते.म्हणून वस्तूला मनात अस्तित्व असते.हे मन माझे असते.माझे मन व्यक्तिनिष्ठ असते.साहजिकच माझ्या कल्पना व्यक्तिनिष्ठ असतात. त्यामुळे या सिध्दान्तास **'व्यक्तिनिष्ठ कल्पनावाद** ' म्हणतात.वेगळ्या भाषेत विश्वात मी आणि माझ्या मनातील कल्पना यांखेरिज अन्य आणखी काही नाहा ! ,अशी ही बर्कलेची भूमिका आहे.तिलाच ***'अहंनिष्ठ कल्पनावाद '*** असेही म्हंटले आहे.

## क) डेमॉक्रिटसचा भौतिकतावाद

**Democrates**
( 460 – 370 BC)
Pythagorean philosopher,
Famous for his moral maxims,
called the *Golden Sentences*



Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052


डेमॉक्रिटस (इ.स.पू.460 ते 370) हा प्राचीन ग्रीक अणुवादी तत्त्वज्ञ होता.या विश्वाची रचना अणुंनी बनलेली आहे, असे तत्त्वज्ञान ल्यूसिपस या तत्त्वज्ञाने मांडले होते.त्या ल्यूसिपसचा शिष्य म्हणजे डेमॉक्रिटस होय.त्याच्यानंतर एपिक्युरिअन तत्त्वज्ञांनी अणुवाद[7] स्वीकारला.डेमॉक्रिटसने विश्वाविषयी अणुवादाच्या स्वरूपात त्याचा भौतिकतावाद मांडला. त्याचे स्वरुप पुढीलप्रमाणे :

डेमॉक्रिटसच्या मते, या विश्वाची,माणसाची आणि आत्म्याची रचना अणुंनी झाली असून ते अणु अतिशय सूक्ष्म असतात. प्रत्येक पदार्थ, वस्तू , पशुपक्षी यांचे विभाजन केल्यास शेवटी विभाजन करता येणार नाही, असा पदार्थ मिळतो तोच अणु होय.विविध प्रकारे त्यांचे संमिश्रण होवून हवा, पाणी, वायू, सजीवांची निर्मिती होते.विश्वाची अंतिम सत्ता असलेले जडद्रव्य अणूंचे बनलेले आहे.अणु असंख्य,छोटेमोठे, अदृश्य, अविनाशी,नित्य,अपरिवर्तनीय आणि अवकाशव्यापी आहेत.

विश्वाची रचना लहानमोठ्या अणुंनी झाली आहे. हे विश्व म्हणजे अनंत अशी पोकळी आहे.विश्वातील या पोकळीत असलेले अणु गतिमान असतात.सर्वात गतिमान अणु विचारवाहक असतात तर ज्ञानाचे अणु सर्वात छोटे गोल,गुळगुळीत असतात.मानवी शरीर व मन यावर अणुंचा आघात होतो.त्यामुळे स्पर्श, रंग इत्यादी संवेदना होतात.

विश्वाच्या निर्मितीमागे कसलाही हेतू नाही, योजना नाही. ते अपघाताने निर्माण झाले आहे. ते अणुंनी बनलेल्या यांत्रिक नियमांनी चालते.या नियमांची रचना गणितीपध्दतीची आहे.ते चालविणारा कोणी ईश्वर, अंतिम तत्त्व इत्यादी काही नाही.

थोडक्यात, विश्व निर्मिती पोकळी, अणु व गति या तीन तत्त्वांनी होते.आपणास दिसणारे हे विश्व एकच नसून पोकळीत अनेक विश्वे आहेत. आपले विश्व त्यापैकी एक आहे.आत्म्याचे अणु सर्व शरीरभर पसरलेले असतात.सुख मिळवणे हे आत्म्याचे ध्येय असल्याने माणसाने नेहमी आनंदी, हसरे असावे; असे डेमॉक्रिटसचे मत होते.म्हणूनच डेमॉक्रिटसला ‘ **हसरा तत्त्वज्ञ** ’ **(The Laughing Philosopher)** म्हणतात.

## ड) देकार्तचा द्वैतवाद :

देकार्तची माहिती आपण दुसऱ्या प्रकरणात घेतली आहेच. आता त्याचा द्वैतवाद पाहू :

देकार्तच्या मते, मानवी व्यक्तित्व दोन प्रमुख घटकांनी बनलेले आहे.शरीर आणि मन.मन हे विचार करणारे द्रव्य असून त्याचेच परिणत रुप म्हणजे आत्मा आहे. हा आत्माच खरा विचार करतो.माणसाचे अस्तित्व खरे तर त्याच्या आत्म्यात असते. केवळ शरीर हे अस्तित्व नाही.

मन जाणीवरुप आहे.तर शरीराला जाणीव नाही. देकार्तच्या मते जाणीव हे मनाचे आणि विस्तार हा शरीराचा गुणधर्म आहे. याचा अर्थ असा की भावभावना,इच्छा,वासना, प्रेम,द्वेष,स्नेह,ममता,करुणा इत्यादी गोष्टी मनाशी संबंधित आहेत तर वजन,उंची,रंग,रुप इत्यादी घटना शरीराबाबत घडतात.याचा अर्थ मन व शरीर यांचे गुणधर्म परस्परविरोधी आहेत.


असे असूनही त्यांचा निकटचा संबंध आहे, ते परस्परांवर परिणाम करतात.मनाला खाण्याची इच्छा झाली की ते शरीरामार्फत अन्न मिळविण्याच्या हालचाली करते.शरीराला जखम झाली की मनाला वेदना होतात.इंद्रिये शारीरिक आहेत पण संवेदना मनाला पोहोचतात, हा अनुभव आहेच.शरीर व मन ही दोन तत्त्वे परस्परांवर आंतरक्रिया करताना दिसतात.अशा परस्परविरोधी तत्त्वांचा संबंध येतो कसा ?

[7]भारतात अणुवाद वैशेषिक दर्शनाने मांडला.हे दर्शन मांडणारे ऋषी म्हणजे कणाद. कण म्हणजेच अणुंनी विश्व बनले आहे, असे त्यांचे तत्त्वज्ञान होते.

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

अस्तित्वात असणे याचा अर्थ विचार
करणे.म्हणून
**“ मी विचार करतो म्हणून मी आहे ”**
असे देकार्त म्हणतो.






देकार्त म्हणतो की मन किंवा आत्मा शरीरातच असतो.मन व शरीर वेगळे करता येत नाहीत.पण वेगळी तत्त्वे आहेत.हाच त्याचा द्वैतवाद होय.दोन्ही तत्त्वांची गल्लत करता कामा नये, असे तो म्हणतो.शरीरात मन डोक्यात असणाऱ्या पिनीअल ग्रंथीमध्ये राहाते.मनाला काही इच्छा झाली तर ते या ग्रंथीमार्फत शरीराला कळविते, शरीर हालचाल करते.शरीराला काही इच्छा झाली तर ते या ग्रंथीमार्फत मनाला कळविते, मन तसा विचार करते, निर्णय घेत.याचा अर्थ ही ग्रंथी या दोघांचा संबंध प्रस्थापित करणारे केंद्र आहे.

देकार्तचा हा शरीर- मनाचा आंतरक्रियावाद समाधानकारक नाही.देकार्त ही बाब कबूल करतो.शरीर व मन एकत्र असतात, पण त्यांच्यात ऐक्य नसते.मन हे जणू एखाद्या यंत्रात भूत बसावे, तसे शरीरात असते, असे तो मानतो.

शरीर हे यंत्र आहे
तर
मन हे भूत आहे.
म्हणून देकार्त या मनाचे वर्णन तो
**“यंत्रातील भूत”**
**(The Ghost in the Machine)**
या शब्दात करतो



देकार्तच्या सिध्दान्तापासूनच शरीरशास्त्र, व मानसशास्त्र अशी दोन शास्त्रे नव्याने अस्तित्वात आली आणि दोघांचा स्वतंत्र अभ्यास सुरु झाला.

## 5) ॲरिस्टॉटलचा कार्यकारण सिध्दान्त :

**प्रस्तावनाः**

कोणतीही घटना घडली की कशी व का घडली ? असे प्रश्न मनात सहज येतात. जगात जे जे घडते त्या प्रत्येक घटनेमागे कारण असलेच पाहिजे, असे वाटते.जे घडते, जन्माला येते, अस्तित्वात येते त्याला दुसरी एक किंवा अनेक घटना जबाबदार व कारणीभूत असतात, कोणतीही घटना स्वत:हून घडत नाही.कारणाशिवाय काहीच घडत नाही,असा विश्वास प्रत्येक सुशिक्षित, निरक्षर, बुध्दिमान,कमी बुध्दिमान माणसाला वाटतो. त्याला

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*


तर्कशास्त्राचे ज्ञान असो किंवा नसो.कारणकल्पना जणू स्वयंसिध्द, निश्चित व संशयापलिकडील आहे, अशीच जणू अंधश्रध्दा असते !


कारण म्हणजे काय ? जे काही निर्माण करते ते कारण आणि जे निर्माण होते ते कार्य.कार्य हे नेहमी कारणाहून भिन्न, संपूर्ण नवीन असते.प्रत्येक घटनेमागे काहीतरी कारण असतेच.घटना सामाजिक अथवा नैसर्गिक अशा दोन मुख्य प्रकारची असते.व्यवहारातील शुभ- अशुभ इत्यादी बाबत आपण कार्यकारणभाव पाहात असतो.नवी नवरी घरी आली की काहीतरी नको असलेले घडते तेंव्हा नवरीलाच कारण समजले जाते.मांजर आडवे गेले की अशुभ वाटते.इत्यादी .पण ही चुकीची उदाहरणे आहेत.

कार्यकारण हा तत्त्वज्ञानातील मूलभूत व आजही वादग्रस्त प्रश्न आहे. त्याची सोडवणूक करण्याचा प्रयत्न प्रत्येक तत्त्वज्ञ करीत असतो.ॲरिस्टॉटल आणि ह्यूम यांनी केलेला विचार मात्र अजोड आहे.

आपण या दोघा तत्त्वज्ञांचे विचार थोडक्यात समजावून घेवू.

ॲरिस्टॉटल (इ.स.पू.384 ते 322)हा प्लेटोचा शिष्य.तत्त्वज्ञानाला आणि चिंतनाला ज्याने शिस्त आणली तो हाच तत्त्वज्ञ आहे. त्याच्याच तत्त्वज्ञानाला **'आद्य तत्त्वज्ञान'(First Philosophy)** म्हणतात.त्याने विचार केला नाही, ज्याचे शास्त्र बनविले नाही, असा विषय या जगात नाही, असे म्हणतात. म्हणून ॲरिस्टॉटलला ***'विचारवंताचा विचारवंत'(The Thinker of the thinkers)*** किंवा 'आचार्य' **(The Master)** म्हंटले जाते.हा जगातील पहिला आचार्य होय.त्याने किमान एक हजार पुस्तके लिहिली असावीत, असा इतिहासतज्ञांचा अंदाज आहे.





Aristotle's Universe

ॲरिस्टॉटलचा कार्यकारण सिध्दान्त हा त्याच्या सत्ताशास्त्राचा गाभा आहे.त्याने त्याचा द्रव्य आणि आकारविषयक सिध्दान्त मांडताना कारणविषयक सिध्दान्त मांडला.त्याचा द्रव्य आणि आकार विषयक सिध्दान्त म्हणजे त्याने प्लेटोच्या आयडिया सिध्दान्तावर केलेली टीका आहे.प्लेटोने वस्तूपासून द्रव्य म्हणजे आकार वेगळा केला आणि आयडियांचे जग निर्माण केले.वस्तू नसल्या तरी आयडियांचे जग अस्तित्वात असते, असे प्लेटोचे म्हणणे होते.

पण ॲरिस्टॉटल हे मत खोडून काढतो. प्लेटो ज्यास आयडिया म्हणतो त्यास ॲरिस्टॉटल आकार **(Form)** म्हणतो.एखादी वस्तू अस्तित्वात येते तेंव्हा ती केवळ आयडियानुसार आकाराला येत नाही तर काहीतरी द्रव्यही असते. पण द्रव्यापासून आकार वेगळ करता येत नाही. द्रव्य आणि आकार यांना केवळ विचारातच वेगळे करता येवू शकते. वास्तवात त्यांना वेगळे करणे शक्य नाही.

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*



ऑरिस्टॉटलने कारणाचे चार प्रकार मानले.ते पुढीलप्रमाणे :

1. **द्रव्य कारण** (Material Cause): ज्या द्रव्याची वस्तू बनते ते द्रव्य.दगडी पुतळ्यात दगड हे द्रव्य . यास उपादान कारण असेही नाव आहे.
2. **आकार कारण** (Formal Cause): वस्तू अस्तित्वात येताना जो आकार ती वस्तू धारण करते ते.पुतळा हे रुप.
3. **निमित्त कारण** (Efficient Cause):द्रव्याला आकार देणारी शक्ति.पुतळ्याला आकार देणारा मूर्तिकार.
4. **अंतिम कारण** (Final Cause) : ज्या हेतूसाठी ती वस्तू निर्माण होते ते अंतिम हेतू कारण.पुतळ्याचे रसग्रहण करणे.

ऑरिस्टॉटलच्या मते प्रत्येक वस्तू एक द्रव्य असते आणि त्या द्रव्याला काहीएक आकारही असतो.उदाहरणार्थ माती या द्रव्याला मडके,गणेशमूर्ती हे आकार असू शकतात.ते आकाराला आणणाराही कुणीतरी असतो.तो मूर्तिकार होय.पण जेथे माणूस नसेल तेथे अन्य काहीतरी असते.जसे बीमधून झाड निर्माण होते तेंव्हा झाड निर्माण करणारी शक्ति ते काम करते.ती निमित्त कारण बनते.हेतू म्हणजे ज्यासाठी ते कार्य किंवा वस्तू निर्माण होते ते प्रयोजन. घराचे प्रयोजन वास्तव्य करणे,हे असते.

येथे आकार याचा अर्थ इंग्लीशमध्ये shape म्हणतात त्यापेक्षा व्यापक आहे.वस्तूचे सारतत्त्व essence किंवा प्लेटो ज्यास आयडिया म्हणतो ते  ऑरिस्टॉटलला अभिप्रेत आहे.त्यामुळे वस्तूला द्रव्यकारणाबरोबर आकारकारणही असतेच, ते नाही असे नसते.

ऑरिस्टॉटलच्या मते ही चार कारणे म्हणजे एकाला दुसरा पर्याय आहे,असे नसून ते चार प्रकार आहेत आणि एकाच वेळी चारही कारणे घटनेत उपस्थित असतात.कारण प्रक्रियेत चारही घटक एकाचवेळी कार्य करीत असतात. निसर्गात जे बदल घडतात किंवा माणूस जे घडवितो त्यात ही चारही कारणे समाविष्ट असतातच.

ऑरिस्टॉटलची ही कारणकल्पना आणि आजची विज्ञानातील कारणकल्पना यात फरक आहे.वैज्ञानिक अर्थाने कार्य ही वस्तू नसते तर घटना असते.घटना घडत असते तर वस्तू घडत नसते.ती टिकते.घटना घडण्याच्या क्षणापुरतीच टिकते.नंतर ती भूतकालात जाते.पण वस्तू निर्माण झाली की निर्माण होण्याच्या क्षणापासून ते नष्ट होण्याच्या क्षणापर्यंत ती टिकून राहाते.वस्तू निर्माण होणे व नष्ट होणे याही घटनाच असतात.नैसर्गिक घटनांना कारणे असतात, पण कर्ता असेलच असे नाही आणि म्हणून त्यांना हेतू असतोच, असेही नाही.जसे नदीला महापूर येतो पण त्यात हेतू नसतो.

## ईश्वर : जगाचे अंतिम कारण

ऑरिस्टॉटलच्या मते विश्वात घडणाऱ्या प्रत्येक घटनेला, कार्याला काहीतरी कारण आहे, प्रेरक शक्ति आहे.पण शक्ति स्वत: मात्र कशाचीही कार्य नाही. तिला कुणी निर्माण केलेले नाही.ती सर्वांचे कारण आहे पण तिला कारण नाही. ती विश्वातील प्रत्येक गतिचे, हालचालीचे कारण आहे पण तिला स्वत:ला गति नाही.शिवाय तिला आकारही नाही.या कारणाला  ऑरिस्टॉटल *'अचल चालक' **(Unmoved Mover)*** किंवा 'आद्य चालक ' **(First Mover)** हे नाव देतो. तोच  ईश्वर' होय.

ऑरिस्टॉटलच्या मते ईश्वर जग निर्माण करीत नाही, तो कर्ता नाही.हे जग अनादी कालापासून अस्तित्वात आहेच.ते अनंत, अजात, अनिर्मित आहे.ईश्वर फक्त जगाला आकार देतो , याचा अर्थ तो जगाला चालना देतो, गती देतो.तो पहिला स्वर्ग स्वत: प्रत्यक्ष हलवितो, ताऱ्यांना ,ग्रहांना ढकलतो,गती देतो.एकदा जग गतिमान झाले की मग तो निवृत्त होतो.मग तो जगाकडे लक्ष देत नाही. फक्त आत्मचिंतनात मग्न होतो.तो केवळ विचारस्वरुप

Department Of Philosophy Sangamner College, Sangamner

*Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

उरतो.म्हणून ॲरिस्टॉटल त्यास *'विचारांचा विचार'* ***(The thinking of thinking[8])*** किंवा *God as Thought itself* म्हणतो.

हा ईश्वर व्यक्तिरुप नाही.तो केवल विचाररुप आहे.तेच त्याचे स्वरुप आहे.तो अशरीरी आहे. त्यामुळे तो शारीरीक हालचाली करीत नसतो. त्याच्या हालचाली वैचारिक, आध्यात्मिक, बौध्दिक स्वरुपाच्या असतात.मग अशा ईश्वराच्या वैचारिक कृतीचा विषय कोणता ? तर विचार करणे, चिंतन करणे हाच त्याचा विषय असतो. मग जगाला गति दिली की तो विचार करीत बसतो.तो पूर्ण आत्मकंद्रित आहे. तो भक्तांना पावणारा नाही.त्याच्याशी स्नेह, प्रेम जोडता येत नाही. एखाद्या कंपनीच्या मॅनेजरसारखा कंपनीरुपी जग निर्माण करून हा ईश्वर कंपनीकडे म्हणजे जगाकडे दुर्लक्ष करून आत्मचिंतनात मग्न होवून बसून राहातो !



*************************

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

[8] Aristotle, *Metaphysics* 12, Chapters 7, 9